राज्यातील न्यायालयांना पायाभूत सुविधा निर्माण करण्याकरीता वितरीत करण्यात आलेल्या निधीचे सनियंत्रण करण्याकरीता उच्चस्तरीय समिती स्थापन करणेबाबत

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-१६१५/प्र.क्र.२२०(भाग-३)/का.१३

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
तारीख: १ जून २०१८

<u>वाचा :-</u>

१) विधि व न्याय विभाग, शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-१६१५/प्र.क्र.२२०/भाग-१/का-१३, दिनांक १० ऑक्टोबर २०१६

२) मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाख जनहित याचिका क्र.१५६/२०११ संदर्भात, दिनांक ५ मे २०१७ रोजी दिलेले आदेश

<u>प्रस्तावना :-</u>

राज्यातील न्यायालयांना सोयी-सुविधा निर्माण करुन देण्याच्या अनुषंगाने, न्यायालयांकरिता पायाभूत सुविधा धोरणाच्या मसुद्यास दि.१६ सप्टेंबर,२०१६ रोजी झालेल्या मा.मंत्रीमंडळाच्या बैठकीमध्ये मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार, "Court Infrastructure Policy" (न्यायालयांकरिता पायाभूत सुविधा धोरण), संदर्भ क्र.१ येथील दिनांक १० ऑक्टोबर,२०१६ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आले आहे. सदर धोरणाची प्रत मा.उच्च न्यायालयास मान्यतेसाठी सादर करण्यात आली होती. सदर धोरणाच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालय येथे दाखल असलेली जनहित याचिका क्र.१५६/२०११ प्रकरणी दि.०५ मे,२०१७ रोजी दिलेल्या आदेशातील परिच्छेद (R) मध्ये, राज्यातील न्यायालयांना पायाभूत सुविधा निर्माण करण्याकरीता वितरीत करण्यात आलेला निधी वर्षअखेर समर्पित होणार नाही याकरीता शासनाने एक व्यवस्था निर्माण करण्याबाबत मा.उच्च न्यायालयाने आदेशीत केले होते. त्यानुसार मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांनी सदर बाबीकरीता मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य व प्रधान सचिव व विधि परामर्शी यांच्या अध्यक्षतेखाली दोन समिती गठीत करण्यात येतील, असे प्रतिज्ञापत्रात नमूद केले होते, त्यानुसार न्यायालयांना पायाभूत सुविधा निर्माण करण्याकरीता वितरीत करण्यात आलेल्या निधीचे सनियंत्रण करण्यासाठी उच्चस्तरीय समिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

राज्यातील न्यायालयांना पायाभूत सोयी-सुविधा निर्माण करुन देण्याकरीता वितरीत करण्यात आलेल्या निधीचे सनियंत्रण करण्यासाठी खालीलप्रमाणे उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात येत आहे.

अ.क्र.	समितीवरील नियुक्त अधिकारी	पदनाम
१)	मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य	अध्यक्ष
२)	अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव (वित्त), वित्त विभाग	सदस्य
३)	अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव (नियोजन) नियोजन विभाग	सदस्य
४)	प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग	सदस्य
५)	प्रधान सचिव व विधि परामर्शी, विधि व न्याय विभाग	सदस्य
६)	विधि सल्लागार-नि-सह सचिव (का.१३), विधि व न्याय विभाग	सदस्य सचिव

२. **समितीची कार्यकक्षा पुढीलप्रमाणे राहिल :-**

सदर समिती न्यायालयांना पायाभूत सुविधा निर्माण करण्याकरीता वितरीत करण्यात आलेल्या निधीच्या खर्चाचे सनियंत्रण करेल. तसेच न्यायालयीन पायाभूत सुविधांकरीता वितरीत करण्यात आलेला निधी वर्षअखेरपर्यंत पूर्ण खर्च होण्याच्या दृष्टीने पायाभूत सुविधेच्या बांधकामांचा आढावा घेऊन, सदर कामे विहीत वेळेत पूर्ण करण्याच्या दृष्टीने उपाययोजना सूचवेल.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०६०११२४१४०७८१२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Amogh Shyamkant Kaloti

Digitally signed by Amogh Shyamkant Kaloti
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Law and Judiciary Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=1f733daf00a6028414c43d0cc10d82acab3b732c4edd56e818f8a3b355588753, serialNumber=9ebeebf21dc54ceec51e6d5ffc84bb94ca6af89497279007d66e97dc13547037, cn=Amogh Shyamkant Kaloti
Date: 2018.06.01 12:40:53 +05'30'

(अमोघ श्या. कलोती)
विधि सल्लागार-नि-सह सचिव

प्रत,

१. राज्यपालांचे सचिव
२. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
३. सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक,

४. सभापती, विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
५. अध्यक्ष, विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
६. विरोधी पक्षनेता, विधान परिषद / विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
७. महाप्रबंधक, उच्च न्यायालय , मुंबई.
८. प्रबंधक (निरीक्षणे-२), उच्च न्यायालय (अपिल शाखा), मुंबई.
९. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक.
१०. अपर मुख्य सचिव नियोजन/वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
११. सचिव (बांधकामे), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई
१२.प्रधान सचिव व विधि परामर्शी, विधि व न्याय विभाग यांचे वरिष्ठ स्वीय सहायक.
१३. विधि सल्लागार-नि-सह सचिव (का-१३), विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४.सहसचिव (सेवा) यांचे स्वीय सहाय्यक, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५.उपसचिव (वित्त) / उपसचिव (नियोजन) / उपसचिव (इमारती) (सा.बां.वि.), मंत्रालय, मुंबई.
१६.महाअधिवक्ता, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे स्वीय सहायक.
१७.मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, मुंबई.
१८. मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१९.सरकारी वकील, उच्च न्यायालय, अपील शाखा, रिट सेल, मुंबई-३२.
२०.अवर सचिव / कार्यासन अधिकारी, विधि व न्याय विभागातील सर्व कार्यासने.
२१.निवडनस्ती / संग्रहार्थ कार्या-१३.